महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र उशिप्र-११२६/प्र.क्र.२५/कॅप-२६/विधी ३ व ५ वर्ष/ **१९३१**/२०२६ दिनांक : **०७ ऑगस्ट २०२६**

जाहीर सूचना

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विधी तीन वर्ष (LL.B. 3 Years) व विधी पाच वर्ष (Integrated LL.B. 5 Years) अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत...

संदर्भ : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२७८/ई.१७९१९/मशि-२ दिनांक ०७ ऑगस्ट २०२६ रोजीचे पत्र.

सर्व इच्छुक उमेदवार, पालक, विधी महाविद्यालये तसेच संबंधितांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता अनेक विधी महाविद्यालये बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) यांची मान्यता तसेच संबंधित विद्यापीठांची संलग्नता (Affiliation) प्राप्त करण्याच्या प्रक्रियेत आहेत. संबंधित महाविद्यालयांना आवश्यक मान्यता व संलग्नता प्राप्त होताच त्यांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये (CAP) समावेश करण्यात येत आहे. त्यामुळे, सर्व पात्र उमेदवारांना महाविद्यालय पसंतीक्रम अर्ज (College Option Form) द्वारे नव्याने पसंतीक्रम भरून आपल्या पसंतीच्या विधी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्याची न्याय्य व समान संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पुरते केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये (CAP) पुढील प्रमाणे बदल करण्यात आले आहेत.

१) प्रथम फेरीसाठी (Round-I) महाविद्यालय पसंतीक्रम अर्ज (College Option Form) पुन्हा उपलब्ध करून देणे

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) व संबंधित विद्यापीठांची मान्यता प्राप्त होत असल्याने तसेच संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या मान्यतेनुसार विधी महाविद्यालयांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत (CAP) टप्प्याटप्प्याने समावेश करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रथम CAP फेरीसाठी (Round-I) उमेदवारांनी यापूर्वी भरलेले सर्व महाविद्यालय पसंतीक्रम अर्ज (College Option Form) पुन्हा संपादनासाठी (Unblock) उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

त्यानुसार, सर्व पात्र उमेदवारांना एकवेळची विशेष संधी (One-time Opportunity) म्हणून, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये (CAP) नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या महाविद्यालयांचा विचार करून आपला महाविद्यालय पसंतीक्रम अर्ज (College Option Form) नव्याने भरून अंतिमरित्या सादर करण्यासाठी दिनांक ०९ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदत देण्यात येत आहे. सदर मुदतीत अंतिमरित्या सादर केलेला महाविद्यालय पसंतीक्रम अर्ज (College Option Form) केवळ प्रथम केंद्रीभूत प्रवेश फेरी (CAP Round-I) मधील जागावाटपासाठीच ग्राह्य धरला जाईल.

२) Auto Freeze पद्धत रद्द

प्रथम व/किंवा द्वितीय CAP फेरीमध्ये उमेदवारास त्याच्या प्रथम पसंतीक्रमावरील महाविद्यालयामध्ये जागेचे वाटप झाल्यास, सदर जागा आपोआप राखीव (Auto Freeze) राहणार नाही. प्रथम पसंतीक्रमावरील जागा वाटप झालेल्या उमेदवारासह प्रत्येक उमेदवारास वाटप झालेली जागा Freeze करणे किंवा Betterment पर्याय निवडणे यापैकी कोणताही एक पर्याय निवडण्याचा अधिकार राहील.

३) Freeze पर्याय

ज्या उमेदवारास वाटप झालेली जागा स्वीकारावयाची असेल, अशा उमेदवाराने —

- उमेदवार लॉग-इनद्वारे ₹१,०००/- इतके विहित Seat Acceptance Fee भरावे;
- Freeze पर्याय निवडावा; आणि
- विद्यमान प्रवेश नियमांनुसार विहित मुदतीत संबंधित वाटप झालेल्या संस्थेत उपस्थित राहून कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करावा.

४) Betterment पर्याय

ज्या उमेदवारास पुढील CAP फेरीमध्ये उच्च पसंतीक्रमावरील महाविद्यालय अथवा नव्याने मान्यता प्राप्त झालेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी विचार व्हावा असे वाटत असेल, अशा उमेदवाराने —

- उमेदवार लॉग-इनद्वारे ₹१,०००/- इतके विहित Seat Acceptance Fee भरावे;
- Betterment पर्याय निवडावा; आणि
- पुढील CAP फेरी/फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र समजले जाईल.

Betterment पर्याय निवडलेल्या उमेदवारांना द्वितीय व तृतीय CAP फेरीपूर्वी नवीन College Option Form भरण्याची अथवा पूर्वी भरलेल्या College Option Form मध्ये आवश्यक ते बदल करण्याची मुभा राहील.

५) तृतीय CAP फेरीनंतर जागावाटप अंतिम

तृतीय CAP फेरी पूर्ण झाल्यानंतर Betterment ची कोणतीही संधी उपलब्ध राहणार नाही. तृतीय CAP फेरीत करण्यात आलेले जागा वाटप अंतिम समजण्यात येईल. संबंधित उमेदवाराने विहित मुदतीत वाटप झालेल्या संस्थेत उपस्थित राहून प्रवेश निश्चित करणे आवश्यक राहील.

सही/-
आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(CET) कक्ष, मुंबई.

सत्यमेव जयते

GOVERNMENT OF MAHARASHTRA

MAHARASHTRA STATE COMMON ENTRANCE TEST (CET) CELL

8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001

Tele. No. - 022-22016157/53/59 Website -www.mahacet.org E-Mail-cetcell@mahacet.org

No. HED-1126/CR.No.25/CAP Reg 2026/**1931**/2026 Date: **07 Aug 2026**

Public Notice

Admissions to Three-Year LL.B. and Five-Year Integrated LL.B. Programmes

Academic Year 2026–27

Ref : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२७८/ई.१७९१९/मशि-२ दिनांक ०७ ऑगस्ट २०२६ रोजीचे पत्र.

It is hereby informed to all aspiring candidates, parents, law colleges, and other stakeholders that, for the Academic Year 2026–27, several law colleges are in the process of obtaining approval from the Bar Council of India (BCI) and affiliation from the respective Universities. As and when the requisite approvals and affiliations are granted, such law colleges are being included in the Centralised Admission Process (CAP).

Accordingly, with a view to providing all eligible candidates a fair and equal opportunity to seek admission to the law college of their choice by exercising fresh preferences through the College Option Form, the following changes have been made in the Centralised Admission Process (CAP) only for the Academic Year 2026–27.

1) Re-opening of College Option Form for Round-I

Since approvals from the Bar Council of India (BCI) and the respective Universities are being granted during the admission process and law colleges are being included in the Centralised Admission Process (CAP) in a phased manner on the basis of approvals granted by the Director of Higher Education, Pune, all College Option Forms submitted by candidates for Round-I have been unblocked for editing.

Accordingly, all eligible candidates are being provided a one-time opportunity to refill and finally submit their College Option Form, after taking into consideration the newly included law colleges in the Centralised Admission Process (CAP), on or before 09 August 2026. The College Option Form finally submitted by the candidate within the prescribed period shall be considered only for the seat allotment of the First CAP Round (Round-I).

2) Discontinuation of Auto Freeze

Where a candidate is allotted a seat in his/her first preference college during the First and/or Second CAP Round, such seat shall not be automatically frozen (Auto Freeze). Every candidate, including a candidate allotted his/her first preference, shall have the option either to Freeze the allotted seat or to opt for Betterment.

3) Freeze Option

A candidate who wishes to accept the allotted seat shall:

- pay the prescribed Seat Acceptance Fee of ₹1,000/- through the candidate login;

- select the Freeze option; and
- report to the allotted institution within the prescribed period for document verification and confirmation of admission in accordance with the existing admission rules.

4) Betterment Option

A candidate who wishes to be considered for allotment to a higher preferred college or to a newly approved law college in the subsequent CAP Round(s) shall:

- pay the prescribed Seat Acceptance Fee of ₹1,000/-;
- select the Betterment option; and
- such candidate shall considered to be eligible to participate in the subsequent CAP Round(s).

Candidates opting for Betterment shall be permitted to submit a fresh College Option Form or modify the previously submitted College Option Form before the commencement of the Second and Third CAP Rounds.

5) Finality of Seat Allotment after the Third CAP Round

Upon completion of the Third CAP Round, no further opportunity for Betterment shall be available. The seat allotted in the Third CAP Round shall be treated as final. The candidate shall report to the allotted institution and complete the admission process within the prescribed period in accordance with the applicable admission rules.

Sd/-
Commissioner & Competent Authority
Maharashtra State Common Entrance Test (CET) Cell, Mumbai.